# मराठी साहित्यातून व्यक्त होणाऱ्या स्त्री जाणिवा

प्रा. डॉ. गोपीनाथ बोडखे

संषोधन मार्गदर्षक, मराठी विभाग

आनंदराव धोंडे ऊर्फ बाबाजी महाविद्यालय,

कडा ता. आश्टी जि. बीड

## प्रस्तावना

भारतीय समाजव्यवस्थेमध्ये षिक्षणाचा जस–जसा प्रसार झाला, समाजामंध्ये स्थित्यंतर होऊन निरनिराळ्या प्रदेषातील तसेच खेड्यातील, सर्वसामान्य, भटके–विमुक्त आणि आदिवासी लोक षिक्षणाच्या प्रसारामुळे जागृत होऊ लागले. षेतकरी षेतमजूर, कामगार आणि स्त्री वर्गापर्यत षिक्षणाचे लोण पोहचले. षिक्षणाचे लोकषाहीकरण सुरु झाल्यामुळे समाजातील प्रत्येक घटक सन्मानाने जीवन जगण्याचा प्रयत्न करु लागला. पण तरीही सामाजिक परिस्थिती विशम होतीच. समता, स्वातंत्र्य, न्याय बंधूता आणि स्वाभिमान या मानवी मूल्यांची जाण होऊन समाजातील वेगवेगळ्या पातळ्यावरील विशमतेचे समुळ उच्चाटन झाले असे नाही. विशमव्यवस्था आणि त्याविरुद्धचे असमाधान यामुळे समाजमनातील वेदना व्यक्त होऊ लागली. कथा, कादंबरी, कविता आणि आत्मचरित्र वाङ्.मयातून ही संवेदना व्यक्त झालेली आपणास पहावयास मिळते.

जन्माला आलेल्या स्त्रीला आयुश्यात मुलगी, पत्नी, आई, सून, मावषी, मामी अषा अनेक वेगवेगळ्या पातळीवर भूमिका पार पाडाव्या लागतात. लहानपणी तिला वडिलांच्या छायेत, तरुणपणी पतीच्या छायेत आणि म्हातारपणी मुलाच्या छायेत आपले जीवन जगावे लागते. पुरुशसत्ताक स्त्रीला पाहिजे तेवढे निर्णय स्वातंत्र्य दिलेले नाही. स्त्रीने कुटुंबासाठी स्वतःचे सुख, दुःख नव्हे तर अस्तित्व विसरुन दुसऱ्याची सेवा करायची, त्याग करत आपले जीवन जगत रहायचे. असे जीवन जगायचे, असे असले तरीही मराठी भाशिक स्त्रीयांनी स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळात आपल्यावर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध लिहिण्यास सुरुवात केली याचे चित्र मराठी वाङ्.मयात आपणास मिळते. बदललेल्या परिस्थितीचा अविश्कार स्त्रीयांच्या लेखनात जाणवू लागला.

## कविता

आधुनिक कालखंडात सन 1920 ते 1950 या काळातील स्त्रीयांच्या कविता गीतांच्या स्वरुपातून निर्माण झालेल्या दिसतात. तरीही त्या गीतामधून त्यांच्या धार्मिक व कौटुबिंक त्यागाची भावना व्यक्त झाल्या आहेत. आधुनिक कालखंड (1950) पर्यन्तच्या प्रमुख कवियीत्री म्हणुन संजीवनी मराठे यांचे नाव पुढे येते. त्यांचे ‘काव्यसंजीवनी’ (1932), ‘राका’ (1939), ‘संसार’ (1943) व ‘छाया’ (1949) असे काव्यसंग्रह प्रकाषित झालेले दिसतात. त्यानंतर षांता षेळके यांच्या ‘वर्शा’ हा कवितासंग्रह (1947) मध्ये प्रकाषित झाला. 1951 मध्ये लक्ष्मीबाई टिळक व बहिणाबाई चौधरी यांचे संपादित काव्यसंग्रह प्रकाषित झाले. इंदिरा संताचा ‘षेला’ (1951) हा प्रकाषित झालेला दिसतो. त्यानंतर पुढे अनेक कवयित्री लिहू लागल्याचे दिसतात.

वडील, मुलगा, पती आणि प्रियकर ही स्त्री जीवनातील षरीरनिश्ट अषी नाती आहेत. विषेश म्हणजे पती व प्रियकर ही नाती अत्यंत नाजूक आहेत. साहित्य हे त्या लेखक किंवा कवीच्या जीवनाचा आरसा मानण्याचा प्रघात आहे. त्यामुळे काही स्त्री कवयित्रींनी आपल्या पूर्वायुश्यातील ‘प्रेम’ व ‘प्रियकर’ उघडकिस येऊ नये म्हणून पुरुशमुखी कविता लिहिल्याची जाणिव होते. त्याच्या कवितेमध्ये पतीलाच प्रियकराच्या रुपात पाहिले जाते. कुठल्याही साहित्यकृतीची उंची ही त्या

साहित्यीकांच्या अभिव्यक्तीमधील प्रमाणिकपणावर अवलंबून असते त्यामुळे अषा कविता सत्व हरवल्यासारख्या भासतात. पतीबरोबर माहेर–सासरच्या भावना जषा व्यक्त होतात तसेच प्रियकरासमवेतच्या गाठीभेटी, रात्रीची विविध रुपे, निसर्गाचे वेगवेगळे अविश्कार, आठवणी, सहवासातील उत्कंट सुख–दुखांच्या स्मृती, दिली घेतलेली वचने, प्रणयाने वेढलेले अतृप्त देहिक तडपड इत्यादी चित्रे स्त्रीयांच्या कवितामधून व्यक्त झालेली दिसतात. ज्याप्रकारे वैयक्तिक अनुभवातून संवेदनक्षम मन व्यक्त झालेले आहे. त्याप्रमाणेच स्त्रीवर होणाऱ्या अन्यायाचा तीव्र वेदना व्यक्त झालेल्या आहेत. मलिका अमर षेख 'वाळूचा प्रियकर' या कवितेमधून म्हणतात.

'रजःस्वला, संभोग, बाळंतपण
षरीराभोवती फिरलेलं
आयुश्यासकट माणसाचं चक्र
मुक्या वेदनांचं वाटोळ.'

अष्विनी घोंगडे यांनी 'स्त्रीसूक्त' कवितेतून म्हटले आहे –

'तो आरषात जसा असतो तसा दिसतो
ती आरषात जषी नसते तषी दिसते'

तर षैला सायनकर 'रक्तकमळाचे रान' मधून म्हटले आहे

'तुझ्या चित्रात माझं नसणं
आता सवयीचं झालयं'

समाजामधील स्त्री–पुरुश विशमतेमुळे स्त्रीवर अन्याय होत आहे. असे आपणास वरील काव्यपक्तीमधून पहावयास मिळते. पुरुशांच्या तुलनेत स्त्री जीवनात बाळंतपण व इतर षारिरीक चक्रामध्ये तिला असाह्य वेदना सहन कराव्या लागतात. अहंकारी पुरुशी प्रवृत्तीमुळे कुटुंबामध्ये असमानतेची वागणूक, पुरुशांचा बाहेरख्यालीपणा यामुळे स्त्रीयांना दुःखाला सामोरे जावे लागते. या सर्व बाबींमुळे तिच्या मनाची झालेली घालमेल स्त्री काव्यामधून व्यक्त होते.

## कथा

स्त्री लेखिकांनी मोठ्या प्रमाणात कथालेखन करुन आपल्या विविध प्रष्नांना वाट मोकळी करुन दिलेली पहावयास मिळते. विभावती षिरुरकर यांचा 'कळ्यांचे निःष्वास' (1933) या कथासंग्रहामधून त्यांनी प्रौढ स्त्रीयांच्या मनातील ताण–तणावांना घेऊन कथा लिहिल्या. अनिश्ट रुढी–परंपरा यामुळे स्त्रीयांचा कोंडमारा होत आहे. त्यावर प्रहार करणाऱ्या कथा दिसून येतात. स्वजातीतील वर (पती) मिळत नसेल तर परजातीतील वर (पती) स्वीकारण्याची तयारी षिरुरकरांच्या कथेतील नायिका दाखवितांना दिसते. वारंवार मुली दाखवण्याच्या कार्यक्रमामुळे उपवर मुलींच्या मनावर येणारे मानसिक दडपणही षिरुरकरांच्या कथेमध्ये प्रकट होताना दिसते. हा निःष्वास कळ्यांचा असला तरी तो बंडखोर स्वरुपाचा आहे. स्त्रीमनाची वेदना प्रकट करणारी आहे. 1845 ते 1960 या कालखंडातील महत्वाच्या लेखिका म्हणुन कुसुमावती देषपांडे, वसुंधरा पटवर्धन व षिरीश पै यांचा उल्लेख करावा लागतो.

1961 नंतर मराठी कथा प्रांतामध्ये स्त्रीजीवन वेगवेगळ्या आयामामधून व्यक्त झाले आहे. त्यामुळे षांता किर्लोस्कर यांचा 'डाक्याची साडी' (1961), कमल देसाई यांचा 'रिंग' (1962), विजया राजाध्यक्ष यांचे 'अधांतर' व 'टिंब' (1965), वसुधा पाटील यांचा 'जमुना के तीर' व 'वंषाचा दिवा' (1968), लिला श्रीवास्तव यांचा 'घुस्मट', उर्मिला षिरुर यांचा 'कवडसा', 1988 मध्ये उर्मिला पवार यांचा 'सहावं बोट', 1990 मध्ये निलम गोऱ्हे यांचा 'उरल्या कहाण्या', उशा दातार यांचा 'काचेची भिंत' इत्यादी कथा संग्रहामधून स्त्रीयांच्या जाणिवा व्यक्त होताना दिसतात.

कथासंग्रहामधून स्त्री जीवनातील वेगवेगळ्या संवेदना व्यक्त होतांना लग्न, त्यांचे षरिर, त्यांचे मन, त्यांची नोकरी या विशयांना घेऊन स्त्री जाणिव व्यक्त झालेली आहे. बालविवाह, विधवाविवाह, पुनर्विवाह, परित्यक्ता, विधवा, निसंतान स्त्रीचे दुःख, वर निवडण्याचे स्वातंत्र्य नसणे, नावडता पती मिळणे, जुलमी पती मिळणे, अरसिक पती मिळणे, पतीचे विवाहबाह्य

षरिर संबंध असणे अषा विशयांना घेऊन स्त्री जीवन कथेतून व्यक्त झालेले दिसून येते. त्याचबरोबर पती बरोबर प्रियकर, मित्र, कार्यालयातील बॉस, प्रेम, निखळ मैत्री, विवाहबाह्य संबंध, कुमारी माता, लैंगिक सुख इत्यादी विशयावरही कथा लिहिलेल्या दिसतात.

नोकरी व्यावसायानिमित्त प्रौढ कुमारिकांचे अनुभवविष्व 'रंग' या कथासंग्रहातील कमल देसाई यांनी चित्र रेखाटले आहे. नोकरी करणाऱ्या स्त्रीयांचे प्रष्न सुनिती आफळे यांच्या 'तिढा' व गौरी देषपांडे यांच्या 'परंतु मुर्खाचे' या कथामध्ये व्यक्त झालेले दिसतात. अनिता काळे यांच्या कथांमध्ये लैंगिक अनुभव, कुमारी माता, कुटूंब नियोजन साधनांचा वापर असे विशय येतात. वयात येणे, गर्भधारणा, गर्भपात, बाळंतपण अषा षरीरकेंद्री अनुभवांवरही लेखिका कथा लिहिलेल्या आहेत. उर्मिला पवार यांच्या कथामंध्ये दलित स्त्रीयांच्या दुःखाना वाचा फोडलेली दिसून येते. मराठी स्त्री कथामधून नोकरी, व्यवसाय करणाऱ्या स्त्रीयांचे दुःख, दैन्य, समस्या व त्यांच्या वेदना अभिव्यक्त होणाऱ्या कथा स्त्री कथा साहित्यामधून व्यक्त झालेल्या म्हणाव्या तेवढ्या दिसून येत नाहीत. ग्रामीण लेखिकांपेक्षा दलित लेखिका आघाडीवर असल्याच्या दिसतात. दलित लेखिकांनी आपले दुःख व्यथा—वेदना आपल्या साहित्यातून व्यक्त केलेल्या आहेत.

**कांदबरी**

साळुबाई तांबवेकर यांनी लिहिलेली 'चंद्रप्रभा विरहवर्णन' (1873) ही पहिली स्त्री लेखिकेने कांदबरी दिसून येते. 1950 पर्यंत स्त्रीयांच्या कांदबरी लेखनाचे स्वरुप हे समाज जागृतीचे विषेशतः प्रबोधपर असल्याचे जाणवते. या कालखंडातील महत्वाच्या लेखिका म्हणुन गीता साने व विभावरी षिरुरकर यांचा उल्लेख करावा लागतो. 'रंगराव' या कांदबरीमधून काषीबाई कानेटकर यांनी स्त्री षिक्षणाचा पुरस्कार केला आहे. 'गृहलक्ष्मी' (1915) जानकीबाई देसाई यांनी हुंडा पद्धतीला विरोध करण्यासाठी कांदबरी लिहिली. 'मुलांचे बंड' (1921) या कांदबरीमधून यषोदाबाई भट यांनी विधवांच्या समस्या मांडल्या आहेत. 'हाच का धर्म' (1930) या कांदबरीमधून षांताबाई नाषिककर यांनी हिंदू समाजातील तत्कालीन वाईट प्रथा आणि रुढीवर प्रहार केला. 'बंधमुक्ता' (1930) या कांदबरीमधून कमलाबाई बंबेवाले यांनी स्त्रीयांच्या घटस्फोटाचा व पोटगीचा विशय मांडला आहे. 'बाळूताई धडा घे' या कांदबरीमधून इंदिराबाई सहस्त्रबुद्धे यांनी स्त्री—पुरुश समानतेचा विचार मांडला आहे. स्त्री कांदबरीचे लेखन हे स्त्रीयांच्या विवाहातून निर्माण होणाऱ्या समस्या घेऊन सुरु झालेले दिसते. 'हिरवळीखाली' (1936) गीता साने यांनी या कांदबरीमध्ये पदवीधर स्त्रीला चार मुलांचा पिता असलेला बिजवर पुरुशाबरोबर विवाह करावा लागतो. तर 'वठलेला वृक्ष' या कांदबरीमधून नायिका कमवती असूनही आपल्या पतीचा छळ सहन करत तिला संसार सांभाळावा लागतो.

स्त्रीयांचे कांदबरी लेखन हे स्त्रीसुधारणेकडून—स्त्रीस्वातंत्र्याकडे विकसित होतांना दिसून येते. स्वातंत्र्योत्तर कालखंडातील स्त्री कांदबरी मधून आजपर्यंत दडपून टाकलेली लैंगिक भावना धीटपणे अभिव्यक्त झालेली आहे. तर स्वातंत्र्योत्तर काळातील स्त्रीयांचे अनुभवविष्व अधिक व्यापक दिसून येते. प्रत्येक क्षेत्रामध्ये पुरुशाच्या बरोबरीने स्त्री वावरतांना पाहण्यास मिळते. तसेच सामाजिक—राजकिय परिस्थिती, लोकांच्या चळवळी व त्या काळात लिहिले जाणारे वाङ्. मय या सर्वांचा एकत्रित परिणाम स्त्री लेखनावर झालेला दिसून येतो.

स्वातंत्र्योत्तर कालखंडातील षिक्षणामुळे व राजकिय हक्कामुळे स्त्रींची पारंपारिक प्रतिमा बदललेली दिसून येते. स्त्रीयांवर होणाऱ्या अन्याय, अत्याचाराविरुद्ध स्त्रींया संघटित स्वरुपात आवाज उठवित आहेत. स्त्री—पुरुश विशमतेवर हल्ला करत आहेत. जुनी पुरुशसत्ताक संकल्पना मूल्यांना प्रखर विरोध होऊ लागला. स्त्री स्वतःकडे एक माणूस म्हणून पाहण्याचा दृश्टीकोन तयार झाला आहे. यामधूनच स्त्री—पुरुश संबंधातील नवी नाती जन्माला येत आहेत. अषी नवी समाजरचना

अस्तित्वात येतांना जूनी समाजव्यवस्था हादरुन जात आहे. या सर्व बदलाचा वास्तववादी चित्रण स्त्री लेखनात उमटतांना पाहवयास मिळत आहे. गौरी देषपांडे यांच्या कांदबरीमधून स्त्री–पुरुशांची मैत्री आणि प्रेमाची विविध रुपे प्रकट झालेली आहेत. तसेच त्यांच्या 'एकेक पान गळावया' (1980), 'काही दूरपर्यन्त' (1985), 'दस्तर हा घाट', 'थांग' (1989) या कांदबरीमधून अभिव्यक्त झालेली स्त्री आधुनिक आहे. स्त्रीयांच्या षारीरिक व मानसिक इच्छांची मोकळी मांडणी कांदबरी लेखनात स्त्री लेखिकांनी केलेली दिसते.

'एका ष्वासाचं अंतर' व 'चाहूल' या कांदबरी लेखनातून अंबिका सरकार यांनी तर 'जिंदल' (1994) आषा बगे, 'रिटा वेलिणकर' (1989), षांता गोखले, 'आवर्तन' (1996) सानिया यांच्या कांदबऱ्यातील स्त्री स्वतःचे निर्णय स्वतः घेतांना दिसून येते. यामधून निर्माण झालेले प्रष्न, समस्या व परिणामांना स्वतःसामोरी जातांना व स्वतःसाठी संघर्श करतांना पहावयास मिळते.

पुरुशवर्गामधून 'स्त्री स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार' अषा प्रकारची प्रतिक्रिया व्यक्त होऊ लागली. स्त्रीयांच्या वागण्या–बोलण्यात व पेहरावात होणाऱ्या परिवर्तनामुळे पुरुशी अहंकारी प्रवृत्ती डिवचली जाऊ लागली. आधुनिक स्त्री म्हणजे स्वैराचारी वृत्तीची स्त्री असे चित्र रंगवण्याचा प्रयत्न होऊ लागला. फॅषनच्या नावाखाली स्त्री कमी कपडे वापरतात म्हणून तिची समाजात छेडछाड होते अषा पुरुशी वर्तनाचे समर्थनही झाले स्त्रीयांच्याही लेखनात आधुनिक स्त्री रंगवितांना लैंगिक उत्तेजन निर्माण करणारी वर्णने येऊ लागली. पुरुशांचे अनुकरण करणारे लेखन स्त्रीयांकडूनही होऊ लागले. लोकप्रिय साहित्य लिहिण्यासाठी उथळ भडक प्रसंग निर्मितीचे लेखन होऊ लागले. असे असले तरी स्वातंत्र्योततर काळातील मराठी स्त्री साहित्यामधून जे लेखन झाले त्यामधून स्त्रीयांच्या जाणिवा प्रकट झालेल्या पहावयास मिळतात.

सुरुवातीच्या कालखंडातील स्त्रीयांचे लेखन समाज सुधारणेच्या चळवळीने प्रेरीत झालेले होते. पण नंतरच्या कालखंडातील स्त्री लेखनाने स्वातंत्र्य, समता, न्याय व बंधूता या मूल्यांचा आंगिकार करुन लेखन केलेले दिसते. विषेशतः स्त्री स्वातंत्र्याचा स्वर अधिक तिव्रतेने व्यक्त झालेला आहे. स्त्रीयांवरील अन्याय, अत्याचारा विरुद्ध जनमत अस्वस्थ होतांना दिसते. स्त्रीच्या व्यथा वेदना, दुःख दैन व बदललेला परिस्थितीचा अविश्कार स्त्रीयांच्या लेखनात जागवून येतो.

## सारांष

स्वातंत्र्योत्तर कालखंडातील स्त्री लेखिकांनी आपल्या व्यथा–वेदना साहित्याद्वारे व्यक्त केलेल्या आहेत. प्रारंभी काळात स्त्रीयांनी केलेल्या लेखनावर पुरुशसत्ताक मूल्यांचा पगडा दिसून येतो. आपले षरिर व सौदर्य हे पुरुशासाठीच आहे अषा भावना काही लेखिकांनी आपल्या लेखनातून मांडलेल्या आहेत. पुरुशाच्या प्रेमाची आराधना करणे तसेच लेखन काही लेखिकांनी केलेले दिसून येते. पण नंतरच्या कालखंडामध्ये स्त्री लेखिकांनी आपल्या संमग्र अनुभवांना षब्दरुप दिलेले आहे. पांरपारिक स्त्रीयांच्या मानसिकतेमध्ये झालेला आमुलाग्र बदल याचे पडसाद त्यांच्या लेखनातून अभिव्यक्त झालेले पहावयास मिळते.

स्त्रीसाहित्याचा लेखनाचा प्रवाह निखळ वाड्.मयीन प्रवाह नसुन ते सामाजिक बदलाचा प्रवाह आहे. सामाजिक स्थित्यंतरांचा आषय या प्रवाहामध्ये व्यक्त होतांना जाणवतो. असे असले तरी स्त्री साहित्यांने स्त्रीयांना सन्मानाने जीवन जगण्यासाठी प्रेरणा व उत्तेजन दिले आहे. पण समाजव्यवस्थेतील सर्वच स्थरातील स्त्रीयांचे जीवन स्त्रीसाहित्यामधून अजूनही अभिव्यक्त झालेले दिसत नाही. उदा. ग्रामीण, आदिवासी व अल्पसंख्याक स्त्री जीवन इत्यादी स्त्रीवादी साहित्यातून मध्यमवर्गीय व उच्च वर्णीय स्त्रीयांचे जीवन त्यांच्या जाणिवा व्यक्त झालेल्या आहेत, आणि त्यामधून स्त्री जीवनाला नवी दृश्टी, नवा आयाम मिळालेला दिसून येतो.

## संदर्भ


1) स्त्रीयांची नवकथा : वाटा आणि वळणे – मंगला वरखेडे

2) आधुनिक मराठी कवयित्रींची कविता – रा.ग.जाधव

3) स्त्रीलिखित कांदबऱ्या : प्रेरणा आणि प्रवृत्ती – विदया देवधर

4) मराठी लेखिका : चिंता आणि चिंतन – भालचंद्र फडके

5) स्त्री स्वातंत्र्यावादिनी विसाव्या षतकातील परिवर्तन – विनया खडपेकर